श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## UG- 11.15 तृतीय सोपान



स्व धाम प्रस्थान को देखो हो रहे श्रीकृष्ण तैयार ।
उद्धृत किए उद्धव समक्ष अद्भुत अनमोल उद्गार ।।

नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।
देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।
प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्

श्रीमद्भागवतमहापुराणम्
एकादशः(स्) स्कन्धः
॥ अथ पञ्चदशोऽध्यायः ॥

श्रीभगवानुवाच
जितेन्द्रियस्य युक्तस्य, जितश्वासस्य योगिनः ।
मयि धारयतश्चेत, उपतिष्ठन्ति सिद्धयः ॥ 1॥

भगवान श्रीकृष्ण म्हणतात – योगी जेव्हा इंद्रिये, प्राण आणि मन आपल्या स्वाधीन करून घेऊन चित्त माझे ठिकाणी एकाग्र करतो, तेव्हा त्याच्यासमोर पुष्कळ सिद्धी येऊन उभ्या राहतात. (१)

**उद्धव उवाच**

**कया धारणया कास्वित् , कथं(म्)स्वित् सिद्धिरच्युत ।**

**कति वा सिद्धयो ब्रूहि, योगिनां(म्) सिद्धिदो भवान् ॥ 2॥**

उद्धव म्हणाला – हे अच्युता ! आपणच योग्यांना सिद्धी देणारे आहात. तेव्हा कोणत्या धारणेने कोणत्या प्रकारची सिद्धी कशी प्राप्त होते आणि त्यांची संख्या किती आहे, हे मला सांगा. (२)

**श्रीभगवानुवाच**

**सिद्धयोऽष्टादश प्रोक्ता, धारणायोगपारगैः ।**

**तासामष्टौ मत्प्रधाना, दशैव गुणहेतवः ॥ 3॥**

श्रीकृष्ण म्हणाले – उद्धवा ! धारणा योगातील निष्णात योग्यांनी अठरा प्रकारच्या सिद्धी सांगितल्या आहेत. त्यांपैकी आठ सिद्धी मुख्यतः माझ्या ठिकाणीच वास करतात. उरलेल्या दहा सत्त्वगुणाचा विकास झाल्याने साधकाला प्राप्त होतात. (३)

**अणिमा महिमा मूर्तेर्- लघिमा प्राप्तिरिन्द्रियैः ।**

**प्राकाम्यं(म्) श्रुतदृष्टेषु, शक्तिप्रेरणमीशिता ॥ 4॥**

त्यांपैकी 'अणिमा' 'महिमा' आणि 'लघिमा' या तीन सिद्धी शरीराशी संबंधित आहेत. 'प्राप्ती' नावाची इंद्रियांची सिद्धी आहे. लौकिक आणि पारलौकिक पदार्थांचा अनुभव करून देणारी 'प्राकाम्य' नावाची सिद्धी आहे. माया आणि तिच्या कार्यांना आपल्या इच्छेनुसार चालविणे या सिद्धीला 'ईशिता' असे म्हणतात. (४)

**गुणेष्वसं(ङ्)गो वशिता, यत्कामस्तदवस्यति ।**

**एता मे सिद्धयः(स्) सौम्य, अष्टावौत्पत्तिका मताः ॥ 5॥**

विषयांमध्ये राहूनसुद्धा त्यामध्ये आसक्त न होणे हिला 'वशिता' म्हणतात आणि ज्याची ज्याची इच्छा करावी, ती पूर्णपणे मिळवणे, ती 'कामावसायिता' नावाची आठवी सिद्धी होय. या आठ सिद्धी माझ्या ठायी स्वभावतःच आहेत. (५)

**अनूर्मिमत्त्वं(न्) देहेऽस्मिन्, दूरश्रवणदर्शनम् ।**

**मनोजवः(ख्) कामरूपं( म्), परकायप्रवेशनम् ॥ 6॥**

**स्वच्छन्दमृत्युर्देवानां(म्), सहक्रीडानुदर्शनम् ।**

**यथास(ङ्)कल्पसं(म्)सिद्धि- राज्ञाप्रतिहतागतिः ॥ 7॥**

देहावर तहान-भुकेचा परिणाम न होणे, पुष्कळ लांबची वस्तू दिसणे, पुष्कळ लांबचे ऐकू येणे, मनाच्या वेगाने शरीरानेही त्या ठिकाणी जाणे, पाहिजे ते रूप घेणे, दुसऱ्या शरीरात प्रवेश करणे, आपल्या इच्छेनुसार शरीर सोडणे, अप्सरांबरोबर होणाऱ्या देवक्रीडेचे दर्शन होणे, जो संकल्प कराल तो सिद्ध होणे, सगळ्या ठिकाणी, सगळ्यांकडून आपल्या आज्ञेचे पालन होणे, या दहा सिद्धी सत्त्वगुणाच्या विशेष विकासाने प्राप्त होतात. (६-७)

त्रिकालज्ञत्वमद्वन्द्वं(म्), परचित्ताद्यभिज्ञता ।

अग्न्यर्काम्बुविषादीनां(म्), प्रतिष्टम्भोऽपराजयः ॥ 8॥

तिन्ही काळांतील गोष्टी समजणे, शीत-उष्ण इत्यादी द्वंद्वांचा त्रास न होणे, दुसऱ्याच्या मनातील विचार ओळखणे, अग्नी, सूर्य, जल, विष इत्यादींच्या शक्ती बोथट करणे आणि कोणाकडूनही पराजित न होणे – या पाच सिद्धीसुद्धा योग्यांना प्राप्त होतात. (८)

एताश्चोद्देशतः(फ्) प्रोक्ता, योगधारणसिद्धयः ।

यया धारणया या स्याद् , यथा वा स्यान्निबोध मे ॥ 9॥

योगधारणा केल्याने ज्या सिद्धी प्राप्त होतात, त्यांचे मी नावांसह वर्णन केले. आता कोणत्या धारणेने कोणती सिद्धी, कशी प्राप्त होते, ते सांगतो, ऐक. (९)

भूतसूक्ष्मात्मनि मयि,तन्मात्रं(न्) धारयेन्मनः ।

अणिमानमवाप्नोति, तन्मात्रोपासको मम ॥ 10॥

प्रिय उद्धवा ! तन्मात्र नावाचे पंचमहाभूतांचे जे सूक्ष्म रूप, ते माझेच रूप आहे. जो योगी माझ्या या रूपामध्ये आपल्या मनाची धारणा करतो, त्याला 'अणिमा' नावाची सिद्धी प्राप्त होते. (१०)

महत्यात्मन्मयि परे, यथासं(म्)स्थं(म्) मनो दधत् ।

महिमानमवाप्नोति,भूतानां(ञ्) च पृथक् पृथक् ॥ 11॥

आपल्या मनाला महत्तत्त्व रूप माझ्यामध्ये जो धारण करतो, त्याला महत्तत्त्वाकार 'महिमा' नावाची सिद्धी प्राप्त होते. त्याचप्रमाणे एकेका महाभूतामध्ये त्याने मनाची धारणा केली, तरीसुद्धा त्याला त्या त्या महाभूताएवढी 'महिमा' नावाची सिद्धी प्राप्त होते. (११)

परमाणुमये चित्तं(म्),भूतानां(म्) मयि रं(ञ्)जयन् ।

कालसूक्ष्मार्थतां(यँ) योगी, लघिमानमवाप्नुयात् ॥12॥

जो योगी आपले चित्त भूतांच्या परमाणुस्वरूप माझ्या ठिकाणी लावतो, त्याला 'लघिमा' नावाची सिद्धी प्राप्त होते व त्याला कालाच्या सूक्ष्म परमाणूएवढे रूप घेता येते. (१२)

धारयन् मय्यहं(न्)तत्त्वे, मनो वैकारिकेऽखिलम् ।

सर्वेन्द्रियाणामात्मत्वं(म्), प्राप्तिं(म्) प्राप्नोति मन्मनाः ॥ 13॥

योग्याने जर सात्त्विक अहंकाररूप माझ्यामध्ये आपले मन एकाग्र केले, तर तो सर्व इंद्रियांवर स्वामित्व मिळवू शकतो. अशा प्रकारे मन माझ्या ठिकाणी लावणारा भक्त 'प्राप्ती' नावाची सिद्धी प्राप्त करून घेतो. (१३)

महत्यात्मनि यः(स्) सूत्रे, धारयेन्मयि मानसम् ।

प्राकाम्यं(म्) पारमेष्ठ्यं(म्) मे, विन्दतेऽव्यक्तजन्मनः ॥ 14॥

महत्तत्त्वाचा अभिमानी असा जो सूत्रात्मा त्या रूपातील माझ्या ठिकाणी मनाची धारणा केली, तर 'प्राकाम्य' नावाची सिद्धी प्राप्त होते. तो अव्यक्तापासून जन्मलेल्या मज परमेश्वरे श्रेष्ठत्व प्राप्त करून घेतो. (१४)

विष्णौ त्र्यधीश्वरे चित्तं(न्), धारयेत् कालविग्रहे ।

स ईशित्वमवाप्नोति, क्षेत्रक्षेत्रज्ञचोदनाम् ॥ 15॥

त्रिगुणात्मक मायेचा स्वामी असलेल्या माझ्या या कालशरीर विष्णुस्वरूपामध्ये जो चित्ताची धारणा करील, त्याला 'ईशित्व' नावाची सिद्धी प्राप्त होते. त्यामुळे त्याला जीवांना व त्यांच्या शरीरांना प्रेरणा देण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. (१५)

नारायणे तुरीयाख्ये, भगवच्छब्दशब्दिते ।

मनो मय्यादधद् योगी, मद्धर्मा वशितामियात् ॥ 16॥

विराट, हिरण्यगर्भ व कारण या तीन उपाधींनी रहित म्हणून 'तुरीय' व सहा ऐश्वर्यांनी संपन्न म्हणून 'भगवान' अशी ज्यांना नावे आहेत, त्या माझ्या नारायणस्वरूपामध्ये जो योगी मनाची धारणा करतो, त्याचे ठिकाणी माझे गुण येतात. असा योगी 'वशिता' नावाची सिद्धी प्राप्त करून घेतो. (१६)

निर्गुणे ब्रह्मणि मयि, धारयन् विशदं(म्) मनः ।

परमानन्दमाप्नोति, यत्र कामोऽवसीयते ॥ 17॥

ज्या योग्याचे मन स्वच्छ होऊन निर्गुण ब्रह्म अशा माझ्या ठायी स्थिर झाले आहे, त्याला परमानंद प्राप्त होतो. या स्थितीत त्याला कोणत्याही प्रकारची कामना नसते. हिला "कामावसायिता" नावाची सिद्धी म्हणतात. (१७)

श्वेतद्वीपपतौ चित्तं(म्), शुद्धे धर्ममये मयि ।

धारयञ्छ्वेततां(यँ) याति, षडूर्मिरहितो नरः ॥ 18॥

श्वेतद्वीपाचा स्वामी व धर्मरूप अशा माझ्या विशुद्ध स्वरूपात जो आपले चित्त स्थिर करतो, तो तहान, भूक, काम, क्रोध, शोक, मोह यांनी त्रासला जात नाही व माझ्या शुद्ध स्वरूपाची त्याला प्राप्ती होते. (१८)

मय्याकाशात्मनि प्राणे, मनसा घोषमुद्वहन् ।

तत्रोपलब्धा भूतानां(म्), हं(म्)सो वाचः(श्) शृणोत्यसौ ॥ 19॥

आकाशात्मा जो समष्टि-प्राण त्या माझ्या स्वरूपात जो मनाने अनाहत-नादाचे चिंतन करतो, तो 'दूरश्रवण' नावाच्या सिद्धीने युक्त होतो. या सिद्धीमुळे त्या योग्याला आकाशातील निरनिराळ्या वाणी ऐकू येतात. (१९)

चक्षुस्त्वष्टरि सं(यँ)योज्य, त्वष्टारमपि चक्षुषि ।

मां(न्) तत्र मनसा ध्यायन्, विश्वं(म्) पश्यति सूक्ष्मदृक् ॥20 ॥

जो योगी डोळ्यांना सूर्यामध्ये आणि सूर्याला डोळ्यांमध्ये एकरूप करतो आणि त्या दोन्हींमध्ये मनाने माझे ध्यान करतो, त्याची दृष्टी सूक्ष्म होते, त्याला 'दूरदर्शन' नावाची सिद्धी प्राप्त होते आणि तो सगळे विश्व पाहू शकतो. (२०)

**मनो मयि सुसं(यँ)योज्य , देहं(न्) तदनु वायुना ।**

**मद्धारणानुभावेन, तत्रात्मा यत्र वै मनः ॥ 21॥**

मन आणि शरीराला प्राणवायूसह माझ्याशी जोडून जो माझी धारणा करतो, त्याला 'मनोजव' नावाची सिद्धी प्राप्त होते. त्यामुळे तो योगी जेथे मन जाईल, तेथे शरीराने त्याच क्षणी जाऊ शकतो. (२१)

**यदा मन उपादाय , यद् यद् रूपं(म्) बुभूषति ।**

**तत्तद् भवेन्मनोरूपं(म्), मद्योगबलमाश्रयः ॥ 22॥**

ज्यावेळी योगी मनाला उपादान-कारण बनवून ज्या कोणाचे रूप धारण करू इच्छितो, ते रूप तो आपल्या मनाप्रमाणे धारण करतो. कारण, त्याने आपले मन माझ्याशी जोडलेले असते. (२२)

**परकायं(वँ) विशन् सिद्ध, आत्मानं(न्) तत्र भावयेत् ।**

**पिण्डं(म्) हित्वा विशेत् प्राणो, वायुभूतः(ष्) षडङ्घ्रिवत् ॥ 23॥**

जो योगी दुसऱ्या शरीरात प्रवेश करू इच्छितो, त्याने अशी भावना करावी की, आपण त्याच शरीरात आहोत. असे केल्याने त्याचा प्राण वायुरूप धारण करतो आणि भ्रमर जसा एका फुलावरून दुसऱ्या फुलावर सहज जातो, त्याप्रमाणे तो आपले शरीर सोडून दुसऱ्या शरीरात प्रवेश करतो. (२३)

**पाष्ण्र्याऽऽपीड्य गुदं(म्) प्राणं(म्), हृदुरः(ख्)कण्ठमूर्धसु ।**

**आरोप्य ब्रह्मरन्ध्रेण, ब्रह्म नीत्वोत्सृजेत्तनुम् ॥ 24॥**

योग्याला जर शरीराचा त्याग करावयाचा असेल तर त्याने टाचने गुदद्वार दाबून धरून प्राणवायूला अनुक्रमे हृदय, छाती, कंठ आणि मस्तकात घेऊन जावे. नंतर ब्रह्मरंध्राच्या मार्गाने त्याला ब्रह्मामध्ये लीन करून शरीराचा त्याग करावा. (२४)

**विहरिष्यन् सुराक्रीडे, मत्स्थं(म्) सत्त्वं(वँ) विभावयेत् ।**

**विमानेनोपतिष्ठन्ति, सत्त्ववृत्तीः(स्) सुरस्त्रियः ॥ 25॥**

देवतांच्या विहारस्थलांमध्ये क्रीडा करण्याची इच्छा असेल त्याने माझ्या ठिकाणच्या सत्त्वगुणाचे ध्यान करावे. त्यामुळे सत्त्वगुणाच्या अंशस्वरूप अशा सुरसुंदरी विमानात बसून त्याच्याजवळ येऊन पोहोचतात. (२५)

**यथा सं(ङ्)कल्पयेद् बुद्ध्या , यदा वा मत्परः(फ्) पुमान् ।**

**मयि सत्ये मनो युं(ञ्)जं(म्)स्- तथा तत् समुपाश्नुते ॥ 26॥**

माझ्याशी परायण झालेल्या ज्या योग्याने, सत्यसंकल्परूप अशा माझ्यामध्ये चित्त स्थिर केले असेल त्याचा संकल्प सिद्ध होतो. मनाने ज्या वेळी जो संकल्प तो करतो, त्याचवेळी त्याचा तो संकल्प सिद्ध होतो. (२६)।

योगी वै मद्भावमापन्न, ईशितुर्वशितुः(फ्) पुमान् ।

कुतश्चिन्न विहन्येत, तस्य चाज्ञा यथा मम ॥ 27॥

'ईशित्व' आणि 'वशित्व' अशा दोन्ही सिद्धींचा स्वामी असलेल्या माझ्या त्या रूपाचे चिंतन करून जो त्याच भावाने युक्त होतो, माझ्याप्रमाणेच त्याची आज्ञासुद्धा कोणी टाळू शकत नाही. (२७)

मद्भक्त्या शुद्धसत्त्वस्य, योगिनो धारणाविदः ।

तस्य त्रैकालिकी बुद्धिर्- जन्ममृत्यूपबृं(म्)हिता ॥ 28॥

माझी धारणा करीत करीत ज्या योग्याचे चित्त माझ्या भक्तीने शुद्ध झाले असेल, त्याला जन्ममृत्यूसह तिन्ही काळांतील सर्व गोष्टी समजतात. (२८)

अग्न्यादिभिर्न हन्येत, मुनेर्योगमयं(वँ) वपुः ।

मद्योगश्रान्तचित्तस्य, यादसामुदकं(यँ) यथा ॥ 29॥

पाण्यात राहणाऱ्या प्राण्यांचा पाण्याकडून नाश होत नाही, त्याचप्रमाणे ज्या योग्याचे चित्त माझ्यामध्ये स्थिर झाले आहे, त्याच्या योगमय शरीराला अग्नी, पाणी इत्यादी कोणतीही वस्तू नष्ट करू शकत नाही. (२९)

मद्विभूतीरभिध्यायन्, श्रीवत्सास्त्रविभूषिताः ।

ध्वजातपत्रव्यजनैः(स्), स भवेदपराजितः ॥ 30॥

जो योगी श्रीवत्स इत्यादी चिन्हे आणि शंख, चक्र, गदा, पद्म इत्यादी आयुधांनी विभूषित, त्याचप्रमाणे ध्वज, छत्र, चामर इत्यादींनी संपन्न अशा माझ्या अवतारांचे ध्यान करतो, तो अजिंक्य होतो. (३०)

उपासकस्य मामेवं(यँ), योगधारणया मुनेः ।

सिद्धयः(फ्) पूर्वकथिता, उपतिष्ठन्त्यशेषतः ॥ 31॥

अशा प्रकारे जो माझे चिंतन करणारा पुरुष योगधारणेने माझी उपासना करतो, त्याला मी वर्णन केलेल्या सिद्धी पूर्णपणे प्राप्त होतात. (३१)

जितेन्द्रियस्य दान्तस्य, जितश्वासात्मनो मुनेः ।

मद्धारणां(न्) धारयतः(ख्), का सा सिद्धिः(स्) सुदुर्लभा ॥ 32॥

ज्याने आपले प्राण, मन आणि इंद्रियांवर विजय मिळवून माझ्याच स्वरूपावर धारणा केली आहे, त्याला कोणती सिद्धी दुर्लभ असणार ? (३२)

अन्तरायान् वदन्त्येता, युं(ञ्)जतो योगमुत्तमम् ।

मया सम्पद्यमानस्य, कालक्षपणहेतवः ॥ 33॥

परंतु श्रेष्ठ पुरुष असे सांगतात की, जे लोक योगाचा उत्तम अभ्यास करून माझ्याशी एकरूप होऊन राहिले आहेत, त्यांच्यासाठी या सिद्धी हे एक विघ्नच आहे. कारण यांच्यामुळे भगवंतांपर्यंत पोहोचण्यासाठी विलंब होतो. (३३)

जन्मौषधितपोमन्त्रैर्- यावतीरिह सिद्धयः ।

योगेनाप्नोति ताः(स्) सर्वा, नान्यैर्योगगतिं(वँ) व्रजेत् ॥ 34॥

जन्म, औषधी, तपश्चर्या आणि मंत्र इत्यादींमुळे ज्या सिद्धी प्राप्त होतात, त्या सर्व योगाच्या द्वारे प्राप्त होतात. परंतु योगाची अंतिम परिणती जी भगवत्प्राप्ती, ती माझ्यावर धारणा केल्याशिवाय प्राप्त होत नाही. (३४)

सर्वासामपि सिद्धीनां(म्), हेतुः(फ्) पतिरहं(म्) प्रभुः ।

अहं(यँ) योगस्य सां(ङ्)ख्यस्य, धर्मस्य ब्रह्मवादिनाम् ॥ 35॥

ब्रह्मवादी लोकांनी योग, सांख्य, धर्म इत्यादी पुष्कळ साधने सांगितली आहेत. त्यांचा तसेच सर्व सिद्धींचे कारण, पालन करणारा आणि प्रभू मीच होय. (३५)

अहमात्माऽऽन्तरो बाह्योऽ - नावृतः(स्) सर्वदेहिनाम् ।

यथा भूतानि भूतेषु, बहिरन्तः(स्) स्वयं(न्) तथा ॥ 36॥

ज्याप्रमाणे सर्व प्राण्यांच्या आत-बाहेर पंचमहाभूतेच आहेत, त्याचप्रमाणे मी सर्व प्राण्यांच्या आत द्रष्टारूपाने आणि बाहेर दृश्यरूपाने आहे. कारण मी कोणतेही आवरण नसलेला, सर्व प्राण्यांचा आत्मा आहे. (३६)

इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्)

सं(म्)हितायामेकादशस्कन्धे पञ्चदशोऽध्यायः ॥ 15॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्) पूर्णात्पूर्णमुदच्यते

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

ॐ शान्तिः(श्) शान्तिः(श्) शान्तिः ॥

